

पुणे : भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्थेच्या रविवारी आयोजित तिसऱ्या पदवीप्रदान सोहळ्यात आकाश जी. या विद्यार्थ्यास विशेष शैक्षणिक कामगिरीबद्दल सुवर्णपदक आणि प्रमाणपत्र देताना राष्ट्रपती प्रणव मुखर्जी. या वेळी प्रा. कृष्णा गणेश, पृथ्वीराज चव्हाण, के. शंकरनारायणन, स्मृती इराणी, राष्ट्रपती, टी. एन. रामकृष्णन आदी मान्यवर. वृत्त पान ३ वर ▶

# विज्ञानाच्या शिक्षणावर भर हवा

## 'आयसर'मधील पदवीप्रदान सोहळ्यात राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांचे मत

**पुणे, ता. १५ :** "मानवाच्या उन्नतीसाठी विज्ञान महत्त्वपूर्ण असून, तंत्रज्ञानाच्या प्रगतीचेही ते साधन आहे. आपल्या देशाला ज्ञानावर आधारित समाज निर्माण करायचा असेल, तर विज्ञान शिक्षणावर विशेष भर देण्याची गरज आहे," असे मत राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी व्यक्त केले. देशातील उच्च शिक्षण संस्थांना आंतरराष्ट्रीय स्तरावर स्थान मिळविता आले नसल्याचा खेद त्यांनी व्यक्त केला.

भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्थेच्या (आयसर) तिसऱ्या पदवी प्रदान सोहळ्यात राष्ट्रपती बोलत होते. महाराष्ट्राचे राज्यपाल के. शंकरनारायणन, मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, केंद्रीय मनुष्यबळ विकासमंत्री स्मृती इराणी, संस्थेच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष टी. व्ही. रामकृष्णन, संचालक प्रा. कृष्णा गणेश आदी उपस्थित होते. या वेळी ९५ विद्यार्थ्यांना पदवी आणि १३ विद्यार्थ्यांना पीएच.डी. प्रदान करण्यात आली. उल्लेखनीय शैक्षणिक कामगिरीबद्दल आकाश जी. या विद्यार्थ्याला राष्ट्रपतींच्या हस्ते सुवर्णपदक देऊन गौरविण्यात आले.



पुणे : 'आयसर' संस्थेच्या पदवीप्रदान सोहळ्यादरम्यान चर्चा करताना राष्ट्रपती प्रणव मुखर्जी आणि मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना राष्ट्रपती म्हणाले, "समाजाच्या कल्याणासाठी योगदान देण्यास तुम्ही समर्थ आहात. आपला भोवताल चांगला करण्यासाठी प्रयत्नशील राहा. देशातील तरुणांमध्ये प्रचंड ऊर्जा आहे. त्यांची शैक्षणिक गरज आणि अपेक्षा पूर्ण करण्यासाठी नव्या शिक्षण संस्था निर्माण केल्या आहेत. अस्तित्वात असलेल्या संस्थांचा विस्तार झाला आहे. देशाच्या उच्च शिक्षण सुविधेला चालना देण्याची प्रक्रिया अविरतपणे सुरूच राहिली पाहिजे."

"देशातील उच्च शिक्षण संस्था वा विद्यापीठांना जगभरातील पहिल्या २०० दर्जेदार विद्यापीठांच्या रांगेत जाता आलेले नाही. त्यासाठी संस्थांनी गंभीरपणे प्रयत्न केले पाहिजेत. जागतिक संस्थांबरोबर सहयोग, परदेशी अध्यापकांना बोलावून आंतरराष्ट्रीय दर्जा राखण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. शिक्षण व्यवस्थेचा दर्जा तपासण्यासाठी आंतरराष्ट्रीय मानकांच्या आधारे संस्थांनी नियमितपणे शैक्षणिक आढावा घेतला पाहिजे. दर्जावाढीसाठी संस्थांतर्गत यंत्रणादेखील असायला हवी. उच्च शिक्षण संस्थांनी नव्या विशेषत: ऊर्जा, पर्यावरण आणि आरोग्य क्षेत्रात संशोधन केले पाहिजे," असेही ते म्हणाले.

इराणी म्हणाल्या, "संशोधन कार्यात तरुणींची संख्या वाढली पाहिजे. भारतात उच्च शिक्षणात सर्वसाधारण प्रवेशाचे प्रमाण केवळ वीस टक्के असून, चीनपेक्षा ते खूप कमी आहे. याचा गांभीर्याने विचार केला पाहिजे. मुलांमध्ये लहानपणापासूनच विज्ञानाविषयी आकर्षण निर्माण व्हावे, तसेच त्यांच्यात संशोधक वृत्ती रुजविण्यासाठी शालेय स्तरापासून प्रयत्न करण्याची गरज आहे."

### जागतिक दर्जाच्या संस्थांची गरज

**पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, "उच्च शिक्षण क्षेत्रात आणखी सुधारणा करण्याची गरज आहे. त्यासाठी राज्य सरकार प्रयत्न करीत असून, राज्यात दोन स्वयं अर्थसाहाय्यित विद्यापीठांना मंजुरी देण्यात आली आहे. राज्यात जागतिक दर्जाच्या उच्च शिक्षण संस्था उभ्या करण्याचा सरकारचा उद्देश आहे."**

Source: http://epaper2.esakal.com/16Jun2014/Enlarge/PuneCity/page3.htm